## :: प्रेस नोट ::

दि.२८/१२/२०२२

आरोपी लोकसेवक - श्री.- सुधाकर नंदु उगलमुगले,वय ३४ वर्ष,रा.नारेवाडी,ता.केज,जि.बीड (खाजगी इसम ) यांना २०,०००/- ( वीस हजार रुपये) लाच मागणी केल्या वरुन लाचलुचपत प्रतिबंधक विभाग बीड यांचे कडुन कारवाई .

| | |
|---|---|
| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग | बीड |
| पोलीस स्टेशन | नेकनूर |
| गुन्हा नोंद कलम | कलम ७(अ) भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम १९८८ |
| आरोपीचे नांव व कार्यालय | श्री.सुधाकर नंदु उगलमुगले,वय ३४ वर्ष,रा.नारेवाडी,ता.केज,जि.बीड (खाजगी इसम ) |
| लाचेची रक्कम | २०,०००/- रुपये (वीस हजार रुपये) |
| थोडक्यात माहिती | दिनांक २१/०९/२०२२ रोजी तक्रारदार यांनी तक्रार दिली की, तक्रारदार यांचे मुलाचे नावे महात्मा गांधी, राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजने अंतर्गत मंजुर झालेल्या जलसिंचन विहीरीचे कुशल कामगाराचे अनुदानाची रक्कम १०८३१२/ रुपयाचे चेकवर खाजगी इसम श्री.उगलमुगले यांच्या आई सरपंच नारेवाडी यांची सही घेउन देण्यासाठी २०,०००/- ( वीस हजार रुपये ) लाचेची मागणी करत आहेत. तक्रारदार यांना लाच देण्याची इच्छा नसल्याने त्यांनी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, बीड येथे तक्रार दिली.<br>सदर तक्रारीच्या अनुषंगाने दिनांक २१/०९/२०२२ रोजी पंचा समक्ष लाच मागणी पडताळणी केली असता खाजगी इसम श्री.उगलमुगले यांनी तक्रारदार यांचे कडे २०,०००/- ( वीस हजार रुपये ) लाचेची मागणी करुन लाच रक्कम स्विकारण्याचे मान्य केले.<br>आलोसे श्री.सुधाकर नंदु उगलमुगले,वय ३४ वर्ष,रा.नारेवाडी,ता.केज,जि.बीड (खाजगी इसम ) यांनी पंचा समक्ष त्यांची आई सरपंच नारेवाडी यांचे सही घेण्यासाठी तकारदार यांचेकडून २०,०००/- ( वीस हजार रुपये) लाच रक्कम मागणी करुन लाच रक्कम मिळविण्याचा प्रयत्न केला म्हणून त्यांचे विरुध्द पोलीस ठाणे नेकनूर येथे भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम १९८८ कलम ७(अ) अन्वये गुन्हा दाखल करण्याची प्रकिया सुरु आहे. |

सदरची कारवाई मा.संदीप आटोळे,पोलीस अधीक्षक, लाप्रवि औरंगाबाद,श्री.विशाल खांबे,अपर पोलीस अधीक्षक,लाप्रवि औरंगाबाद, श्री.शंकर शिंदे, पोलीस उप अधीक्षक, बीड यांचे मार्गदर्शनाखाली, श्री.अमोल धस, पोलीस निरीक्षक व पोलीस अंमलदार श्री. श्री.भरत गारदे, श्री. अविनाश गवळी, चालक अंमलदार श्री.गणेश मेहत्रे सर्व ला.प्र.वि.बीड युनिट यांनी कारवाई केली आहे.

लाचलुचपत प्रतिबंधक विभागातर्फे नागरीकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारासंबंधी काही माहिती असल्यास अगर लाच मागणाऱ्या लोकसेवकाबददल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग यांचेशी संपर्क साधवा.

संपर्क पत्ता :- लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,बीड

संकेतस्थळ :- **acbwebmail@mahapolice.gov.in**

ई-मेल :- १) **dyspacbbeed@mahapolice.gov.in**

2) **dyspacbbeed@gmail.com**

ऑनलाईन तक्रार ॲप्लीकेशन :- **acbmaharashtra.net**

टोल फ्रि कमांक :- १०६४

दुरध्वनी कमांक :- ०२४४२-२२२६४९

व्हॉटस अप क. :- ९९३०९९७७००

पोलीस अधीक्षक,लाप्रवि,औरंगाबाद :- ९९२३०२३३६१

अपर पोलीस अधीक्षक,लाप्रवि,औरंगाबाद :- ८७८८६४४९९४

पोलीस उप अधीक्षक,लाप्रवि,बीड :- ९३५५१००१००

( शंकर शिंदे )

पोलीस उप-अधीक्षक

लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,बीड.